महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०८ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

संपादकीय

## अनुभवाच्या बळावर स्थैर्याचा संदेश

अनेक महापालिकांच्या निवडणुकांत माजी नगरसेवकांचे वर्चस्व ठळकपणे दिसून येत असून, हा कल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्थैर्य आणि सातत्याचा संकेत देणारा मानला जात आहे. लढतीच्या जागांपैकी मोठ्या संख्येने ठिकाणी अनुभवी लोकप्रतिनिधींना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना संधी देण्यात आल्याने, विकासकामांचा अनुभव आणि प्रशासकीय जाण असलेले नेतृत्व पुन्हा एकदा मतदारांसमोर आले आहे. महापालिकेसारख्या मोठ्या नागरी संस्थेत केवळ उत्साह नव्हे, तर अनुभवाचीही नितांत गरज असते. पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि नागरी सेवा यांसारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नांवर निर्णय घेताना पूर्वानुभव असलेले प्रतिनिधी अधिक प्रभावी ठरू शकतात. याच पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी परिचित आणि कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांवर विश्वास टाकल्याचे बहुतांश महापालिकांत दिसून येते. काही ठिकाणी बिनविरोध स्थिती निर्माण होणे हे स्थानिक पातळीवरील स्वीकारार्हतेचे द्योतक मानले जात आहे. यामुळे विकासाच्या मुद्द्यांवर सातत्य राहण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. अनुभवी नगरसेवकांच्या माध्यमातून प्रलंबित प्रकल्पांना गती मिळणे आणि नवीन योजनांची अंमलबजावणी अधिक वेगाने होणे अपेक्षित आहे.

मात्र, याच वेळी मतदारांसमोर अनुभव आणि अपेक्षा यांचा समतोल साधण्याचे आव्हानही आहे. महापालिकांची ही निवडणूक स्थैर्य, कार्यक्षमता आणि विकासाभिमुख नेतृत्वाला पुन्हा संधी देणारी ठरेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनुभवी नेतृत्वासोबत नव्या अपेक्षा पूर्ण करत शहरांच्या प्रगतीला नवी दिशा देण्याची संधी ही निवडणूक निश्चितच देत आहे. नव्या चेहऱ्यांना संधी दिली असती तर स्थानिक राजकारणाचा पट अधिक व्यापक आणि आशादायी ठरला असता. नव्या उमेदवारांमुळे प्रशासनात ताजे विचार, नव्या कार्यपद्धती आणि आधुनिक दृष्टीकोन येण्याची शक्यता असते. बदलत्या शहरी गरजांशी जुळवून घेण्यासाठी नव्या पिढीची ऊर्जा आणि तंत्रज्ञानस्नेही भूमिका महत्त्वाची ठरू शकते. नव्या प्रतिनिधींमुळे स्थानिक प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी अधिक संवेदनशील झाली असती. वाहतूक, पर्यावरण, स्मार्ट सुविधा, युवकांसाठी रोजगार आणि डिजिटल सेवा यांसारख्या मुद्द्यांना अधिक प्राधान्य मिळाले असते. विशेषतः तरुण आणि प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांना प्रतिनिधित्वाची जाणीव अधिक ठळकपणे झाली असती असे वाटते.





# बदलापूर एमआयडीसी भीषण स्फोटांनी हादरली

## अवघ्या तासाभरात लागोपाठ सहा विस्फोट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, प्रतिनिधी: बदलापूर पूर्वेतील एमआयडीसी परिसरात आज भीषण स्फोटांची मालिका घडून अवघा परिसर हादरून गेला. बदलापूर पूर्व महावितरण कार्यालयाजवळील पॅसिफिक ऑरगॅनिक केमिकल कंपनीत अवघ्या तासाभरात एकामागोमाग एक असे पाच ते सहा स्फोट झाले. या स्फोटांनंतर कंपनीच्या आवारात भीषण आग लागली असून संपूर्ण औद्योगिक परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले.**

स्फोटानंतर आगीचे प्रचंड लोळ आकाशात झेपावत दूरवरूनही दिसत होते. यामुळे एमआयडीसी परिसरातील नागरिकांसह जवळच असलेल्या औद्योगिक आस्थापनांमधील कामगारांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून काही काळासाठी परिसरातील वाहतूकही नियंत्रित करण्यात आली.

आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होते. स्फोटांचा आवाज इतका तीव्र होता की आसपासच्या कंपन्या व वस्त्यांमध्ये कंपन जाणवले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनीही घटनास्थळी धाव घेतली, मात्र पोलिसांनी परिसरात सुरक्षा कडेकोट केली. दरम्यान, या आगीत नेमके किती नुकसान झाले, तसेच जीवितहानी झाली की नाही याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती प्रशासनाकडून देण्यात आलेली नाही. मात्र, स्फोटांच्या तीव्रतेमुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांनी अग्निशमन, पोलीस आणि एमआयडीसी प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून घटनेची सविस्तर माहिती घेतली. नागरिक आणि कामगारांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

आगीच्या कारणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही आमदार कथोरे यांनी सांगितले. घटनेनंतर एमआयडीसी परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला असून प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. स्फोटांचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी प्राथमिक माहितीनुसार परिस्थिती नियंत्रणात आहे. आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याची अधिकृत नोंद सध्या तरी समोर आलेली नाही. प्रशासन आणि अग्निशमन दलाकडून घटनास्थळी सतत देखरेख ठेवण्यात येत आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर सविस्तर माहिती जाहीर केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### 70 वार्षांत महानगरांच्या विकासासाठी

# ना योजना ; ना नियोजन !

### कल्याण, भिवंडी, उल्हासनगरातील सभांतून फडणवीसांचा घणाघात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** देशाच्या स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे 'गावाकडे चला' अशी भूमिका घेतली गेली. मात्र नरेंद्र मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर शहरांच्या विकासाकडे गांभीर्याने लक्ष देण्यास सुरुवात झाली. गेल्या ७० वर्षांत महानगरांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस योजना तयारच झाल्या नाहीत, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. कल्याण पूर्वेतील खडेगोळवली येथे शिवसेना-भाजप महायुतीच्या प्रचार सभेत ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निवडणुकीच्या पहिल्याच टप्प्यात महायुतीच्या २० जागा बिनविरोध निवडून आल्याने काहींना मिरच्या लागल्या आहेत. कल्याण-डोंबिवलीकरांचा आमच्यावर विश्वास आहे, मग तुमच्या पोटात का दुखते, असा सवालही त्यांनी केला. शिवसेना-भाजप जिंकली की ईव्हीएमवर आरोप केले जातात, आता बिनविरोध निवडणूक लागली तरीही





### शहरांच्या विकासाला मोदी सरकारने न्याय दिला – फडणवीस

आक्षेप घेतले जात आहेत, असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला.

कल्याण-डोंबिवली ही केवळ शहरे नसून त्यांना इतिहास आणि संस्कृतीची परंपरा आहे. ही शहरे हिंदुत्ववादी विचारांची ओळख असल्याचे सांगत गेल्या १० ते १५ वर्षांत झालेला विकास नागरिकांच्या डोळयासमोर असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतातील शहरे ही विकासाचे इंजिन असून शहरांचा विकास व्हावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवत शहरांसाठी लाखो कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, असे फडणवीस म्हणाले.

एमएमआरडीएच्या माध्यमातून सुमारे ४ लाख कोटी रुपयांची विकासकामे सुरू असून मेट्रोचे जाळे अधिक मजबूत करण्यात आले आहे. मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल सेवेतही सुधारणा करत मेट्रोसारख्या सुविधा देण्यात येणार असून एसी लोकल कोच साध्या दरात सुरू करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच ई-बसांमुळे प्रदूषणमुक्त प्रवास शक्य होणार असून 'वन टिकीट-वन ट्रान्सपोर्ट' प्रणाली लागू करण्यात येणार आहे.

नागरिकांचा प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले असून झोपडपट्टी पुनर्विकास, २७ गावांचा प्रश्न तसेच इतर प्रलंबित प्रश्न सोडवले जातील. या सर्व कामांनंतर कल्याण-डोंबिवलीची महापालिका पूर्णपणे बदललेली दिसेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम उद्धव ठाकरे यांनी थांबवले नसते तर आज मोठी प्रगती झाली असती, मात्र थांबलेले काम पुन्हा सुरू करण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले, असेही फडणवीस म्हणाले. बिझनेस हब, बुलेट ट्रेन आणि अमेझॉन डेटा सेंटरच्या इको-सिस्टममुळे कल्याण-डोंबिवलीत हजारो रोजगार निर्माण होतील, असा दावा करत येणाऱ्या महापालिका निवडणुकीत महायुतीला अभूतपूर्व यश देण्याचे आवाहन केले.

या सभेला भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, आमदार सुलभा गायकवाड, किसन कथोरे, राजेश मोरे, माजी आमदार नरेंद्र पवार, सुभाष भोईर, निवडणूक प्रमुख नरेंद्र सूर्यवंशी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काँग्रेस शहराध्यक्ष प्रदीप पाटलांसह

# 12 नगरसेवकांचे निलंबन !

### सर्व निलंबित नगरसेवक भाजपच्या वाटेवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीत शिंदे गटाच्या शिवसेनेने २६ जागा जिंकूनही सत्तेपासून दूर राहावे लागले. भाजपने काँग्रेसच्या नगरसेवकांशी हातमिळवणी करत अंबरनाथ विकास मंच स्थापन केला आणि नगराध्यक्षपदावर भाजपचा उमेदवार बसवण्याची तयारी केली. या घडामोडींनंतर भाजप व काँग्रेस या दोन्ही पक्षांनी आपल्या सदस्यांवर कारवाई केल्याने शहरातील राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले आहे.

काँग्रेसने भाजपसोबत युती केल्याच्या आरोपाखाली अंबरनाथचे शहराध्यक्ष प्रदीप पाटील यांच्यासह १२ नगरसेवकांचे निलंबन केले. ही कारवाई अन्यायकारक असल्याचा आरोप करत निलंबित नगरसेवकांनी पक्ष नेतृत्वाविरोधात थेट नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणाला वेगळे वळण देत प्रदीप पाटील



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार किसन कथोरे आणि रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजपात प्रवेश करणार**

**● काँग्रेस शहराध्यक्ष प्रदीप पाटील**

यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. ब्लॉक अध्यक्ष पदासाठी एक कोटी रुपयांची मागणी करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला असून, यामुळे काँग्रेसमधील अंतर्गत वाद उघडपणे समोर आला आहे.

प्रदीप पाटील यांनी सांगितले की, भाजपसोबत स्थानिक पातळीवर झालेल्या युतीबाबत पक्ष नेतृत्वाला आधीच कल्पना देण्यात आली होती. मात्र तरीही थेट निलंबनाची कारवाई करण्यात आली. काँग्रेसने निवडणूक काळात आम्हाला कधीच विचारले नाही, आम्ही आमच्या मेहनतीवर निवडून आलो आहोत, असा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, निलंबित नगरसेवक आणि शहराध्यक्ष प्रदीप पाटील लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ठाणे जिल्ह्यातील भाजप नेतृत्वाच्या उपस्थितीत हा प्रवेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात असून, अंबरनाथमधील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याचे संकेत मिळत आहेत.





महत्वाचे

## राज ठाकरे आज ठाण्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर सभांऐवजी पक्षाच्या शाखांना भेटी देण्यावर भर देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, गुरुवारी (उद्या) सायंकाळी ५ वाजता ठाण्यातील मनसेच्या उमेदवारांच्या पक्ष कार्यालय आणि शाखेला भेट देणार आहेत. ठाणे महापालिका निवडणुकीत मनसे- शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादीची (शरद पवार गट) आघाडी आहे. महापालिका निवडणुकीत शिंदे गटाचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर ठाणे महापालिका निवडणूक चर्चेत आली. मनसेने ठाण्यात २८ मराठी उमेदवार महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत. या उमेदवारांना व्यक्तीशः भेटण्यासाठी राज ठाकरे हे ठाण्यात येत आहेत. गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपासून राज ठाकरे यांची शाखा भेट सुरु होणार असल्याची माहिती मनसेने दिली.

## उल्हासनगरात 'ऑनलाईन मतदार सुविधा' पोर्टलचा शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर ।** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत, मतदारांना त्यांचे मतदान केंद्र आणि आवश्यक माहिती सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने ऑनलाईन मतदार सुविधा पोर्टलचा शुभारंभ मनपा आयुक्तांच्या हस्ते करण्यात आला. उल्हासनगरच्या मतदारांना आता आपल्या मतदान केंद्राची अचूक माहिती मिळवण्यासाठी केवळ 'एक क्लिक' पुरेसे आहे. या पोर्टलच्या माध्यमातून मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राचा पत्ता आणि तेथे पोहोचण्यासाठी नकाशा (जीपीएस ) उपलब्ध असेल.

# एमआयएमच्या 'रॅलीत राडा'

### इम्तियाज जलील यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**छत्रपती संभाजीनगर:** एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या प्रचार रॅलीदरम्यान मोठा गोंधळ उडाल्याची घटना बायजीपूरा परिसरात घडली. जलील यांच्या रॅलीवर एका गटाने चाल करून जात हल्ल्याचा प्रयत्न केल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. इम्तियाज जलील यांची प्रचार रॅली बायजीपूरा भागातून जात असताना काही तरुणांनी त्यांना



काळे झेंडे दाखवत जोरदार निषेध केला. यावेळी जलील यांच्याशी धक्काबुक्की करण्याचाही प्रयत्न झाला. मात्र, पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि रॅली पुढे मार्गस्थ झाली. रॅली संपल्यानंतर मात्र परिस्थिती अधिक चिघळली. अचानक काही तरुण जलील यांच्या वाहनाच्या दिशेने धावून आल्याने दोन गट समोरासमोर आले. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी लाठीचार्ज केला. या धक्काबुक्कीत एक कार्यकर्ता जखमी झाल्याची माहिती आहे. या घटनेनंतर इम्तियाज जलील यांनी गंभीर आरोप करत काँग्रेसचे उमेदवार कलीम कुरेशी यांनी हा हल्ला घडवून आणल्याचा दावा केला आहे. दरम्यान, पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून परिसरात बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.



# NSS शिबिरामधून सर्पजनजागृतीची संकल्पना



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली** : ग्रामीण भागात सर्पदंशामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडतात बऱ्याचदा गावठी औषध किंवा तात्काळ वैद्यकीय मदत न मिळाल्याने सर्पदंश झालेल्या व्यक्ती दगावतो; हे सर्व लक्षात घेत शून्य सर्पदंश मृत्यू याचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथील प्रा. निसर्ग रक्षक व सर्पमित्र प्रवीण भालेराव, वाईल्ड इंडिया 05 फाउंडेशन च्या वतीने व्यापक सर्प जनजागृती करण्यात आली. याकरिता विविध महाविद्यालयाचे ज्या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजना विभागाची निवासी शिबिर सुरू होते अशा ठिकाणी जाऊन सर्पजनजागृती करण्याचे काम करण्यात आले. यामध्ये दिनांक १४-१२-२०२५ रोजी कोलठण येथे (जे एस एम कॉलेज शिवले), दिनांक २०-१२-२५ रोजी साजई येथे (मातोश्री कॉलेज शहाड),दिनांक २५-१२-२५ कान्होळ म्हसा (जीवनदीप कॉलेज म्हसा), दिनांक २९-१२-२५ माणिवली कल्याण (एस एच एम कॉलेज उल्हासनगर), २९-१२-२५ रोजी किशोर मुरबाड (अचिव्हर्स कॉलेज कल्याण), दिनांक ३०-१२-२५ रोजी दहागाव पोई (जीवनदीप महाविद्यालय गोवेली) या सहा कॅम्प साइटवर जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमांतर्गत सक्रिय एनएसएस स्वयंसेवक, स्थानिक नागरीक, वाइल्ड इंडिया 05 फाउंडेशन यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१, विस्तार-२३४

### नोटीस

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय क्रिष्णाजी जोशी | स.नं. १२४, हि.नं ७२, प्लॉट नं. ७५, मौजे - चिकणघर | ०४ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |
| २ | निर्माण पार्क ३ को.ऑप. हौ. सो. लि., कु.मु.प.धा. वेस्टर्न आर्च कंपनी तर्फ भागीदार श्री. जय प्रकाश ठक्कर | स.नं. ९९/अ/२ मौजे-चिकणघर | १० | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा. क्र : कडोंमपा/जसंवि/मुका/८२९
दिनांक :- ०७/०१/२०२६

सही /-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी
वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

## उल्हासनगर महानगरपालिका
### निवडणूक विभाग

मुख्य कार्यालय, दुसरा मजला, उल्हासनगर ४२१००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Tel No:- 0251-2720116/125 Ext. No. 237

जा.क्र.उमपा/निवडणूक/९१०/२०२६ — दि.०७/०१/२०२६

**संदर्भ-सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/का.अ.०६/०१/२०२५, दि.२/१/२०२६**

### शुध्दीपत्रक

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत मा. राज्य निवडणूक आयोगाकडील दिनांक २०/१२/२०२५ रोजीचे पत्रान्वये दिलेले निर्देशानुसार मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या दिनांक ३/१/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, प्रभाग क्र. ८ मधील मतदान केंद्र क्र. २६ व २७ ठिकाण (समाजमंदिर (वधेरीया फाउंडेशन) व्हाईट हाऊस जवळ, उल्हासनगर-२ ऐवजी पेंट ऑक्सफर्ड शाळा, उल्हासनगर-३ तळमजल्यावरील हॉलमध्ये ०२ पार्टीशन येथे निश्चित करण्यात आले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | मतदान केंद्र ज्या यादीत आहे त्याचा प्रभाग क्रमांक | मतदान केंद्राचा अनुक्रमांक | पुर्वी ज्या इमारतीत केंद्र स्थित आहे ती इमारत | मतदान केंद्रात बदल केल्यानंतरचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ८ | २६ व २७ | समाजमंदिर (वधेरीया फाउंडेशन) व्हाईट हाऊस जवळ, उल्हासनगर-२ | पेट ऑक्सफर्ड शाळा, उल्हासनगर-३ तळमजल्यावरील हॉलमध्ये ०२ पार्टीशन |

तसेच प्रभाग क्र. २ अंतर्गत मतदान केंद्र क्र. १३ मध्ये १४०० व मतदान केंद्र क्र. १४ मध्ये १०७ तसंच प्रभाग क्र. ५ अंतर्गत मतदान केंद्र क्र. ८ मध्ये ८२१ व मतदान केंद्र क्र. ९ मध्ये १३३७ इतकी मतदार संख्या तांत्रिक चुकीमुळे घेण्यात आल्याने त्यामध्ये सुधारणा करुन वाढीव मतदार लगतचे मतदान केंद्रात स्थलांतर करण्यात आले आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मतदान केंद्र क्रमांक | मुळ यादीतील मतदारांची संख्या | सुधारीत मतदार यादीतील क्रमांक | | एकुण मतदार संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | | |
| १ | २ | १३ | १४०० | १ | ९०० | ९०० | मतदान केंद्र क्रमांक १३ मधून १४ मध्ये स्थलांतर |
| २ | २ | १४ | १०७ | ९०१ | १४०० | ५००+१०७=६०७ | |
| ३ | ५ | ८ | ८२१ | १ | २०० | २००+८२१=१०२१ | मतदान केंद्र क्रमांक ९ मधून ८ मध्ये स्थलांतर |
| ४ | ५ | ९ | १३३७ | २०१ | १३३७ | ११३७ | |

तरी वरील बदलाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.उमपा/पीआरओ/४७७/२०२६
दिनांक - ०७/०१/२०२६

सही/-
(मनिषा आव्हाळे, भा.प्र.से)
निवडणूक अधिकारी तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# जनार्दन भेरे यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भातसानगर** : जनार्दन भेरे पत्रकार दिनाचे औचित्य साधून मी ठाणेकर न्यूज नेटवर्क आयोजित शहापूर तालुका पत्रकारांच्या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात प्रिंट मीडियाचा एकमेव दिला जाणारा उत्कृष्ट पत्रकर पुरस्कार लोकमतचे जनार्दन भेरे यांना प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार त्यांना शहापूरचे पोलीस निरीक्षक मुकेश ढगे, गटशिक्षणाधिकारी बी राठोड, किशोर कुडव, काशिनाथ तिवरे, अरुण कासार,अशोक ईरनक,शंकर खाडे , योगेश हजारे आदी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

शहापूर सारख्या ग्रामीण भागामध्ये पत्रकारितेचा वसा जपणारे व निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व शेतकऱ्यांबरोबरच अनेक गरजूंचे प्रश्न सरकारी दैनिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून सरकारच्या दालनात उपस्थित करणाऱ्या पत्रकारांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावर्षी केवळ दोन पुरस्कार हे उत्कृष्ट पत्रकारितेसाठी ठेवण्यात आले होते. त्यामध्ये प्रिंट मीडियाचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जनार्दन भेरे यांना देण्यात आला. शाल श्रीफळ सन्मानचिन्ह व रोख पाच हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत अंबर्जे शाळेची ऐतिहासिक यशगाथा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : दि.३० डिसेंबर २०२५ वार मंगळवार रोजी शहापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा गोठेघर वाफे आश्रमशाळा येथील मैदानावर पार पडल्या. यात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,अंबर्जे केंद्र-शेरे,शाळेतील खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर कबड्डी व खोखो मुले व मुली च्या संघाने खेळात अजिंक्यपद प्राप्त केले. विशेष म्हणजे अंबर्जे शाळेच्या मुलांचा व मुलींचे कबड्डी खेळाच्या संघाची या वर्षी हॅट्रिक केली तर खो खो च्या खेळाडूंचे विजयाचे दुसरे वर्ष आहे. असा पराक्रम करणारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,अंबर्जे ही पहिलीच शाळा आहे. त्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी श्री.हिराजी वेखंडे,बीटविस्तार अधिकारी सौ.संगिता माळी, केंद्रप्रमुख श्री.डॉ.शरद सपकाळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. विलास साबळे यांनी विशेष अभिनंदन केले. खेळाडूंना मैदानावर प्रोत्साहन देण्यासाठी यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.गणेश परटोले,पोलीस पाटील श्री.हरिश्चंद्र परटोले, श्री.कृष्णा भोईर,श्री.गणेश परटोले,श्री.रविंद्र परटोले आदि सदस्य उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गावकऱ्यांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

# मातृभाषेचा अभिमान बाळगा – क्षिती जोग
## ‘क्रांतिज्योती’ चित्रपटाचे भिवंडीत प्रमोशन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचलित पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे क्रांतिज्योती विद्यालय (मराठी माध्यम) या चित्रपटाचे उत्साहात प्रमोशन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा आणि मान्यवरांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी चित्रपटातील लोकप्रिय गीत “शाळा मराठी माझी, शाळा मराठी...” यावर सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. तसेच शिक्षिकांनी “स्वर्गात आकाशगंगा” या गीतावर सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमात रंगत भरली. चित्रपटातील कलाकारांनी विद्यार्थ्यांमध्ये जाऊन नृत्यात सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसर नृत्यमय झाला होता. विद्यालयातील शिक्षिका अनिता धानापुने यांनी सादर केलेल्या मराठी गमती-जमतीमुळे वातावरण अधिकच हास्यमय झाले.

या प्रसंगी चित्रपटाच्या निर्मात्या व अभिनेत्री क्षिती जोग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “तुम्ही मोठे झाल्यावर मातृभाषेचा आदर करायला शिका. मी इंग्रजी माध्यमातून शिकले असले तरी माझ्यावर आई-वडिलांनी मराठीत संस्कार केले, हे माझे भाग्य आहे. ‘मला मराठी नीट बोलता येत नाही’ असे म्हणण्याचे काही कारण नाही. जशी येईल तशी अभिमानाने बोला. मराठी माध्यमातून शिकूनही अनेक लोक मोठ्या पदावर पोहोचले आहेत.” विद्यार्थी व शिक्षकांनी सादर केलेल्या नृत्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. चित्रपटाला यश मिळाल्यानंतर ते यश

**कार्यक्रमात विद्यार्थिनींनी चित्रपटातील लोकप्रिय गीत “शाळा मराठी माझी, शाळा मराठी...” यावर सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.**

विद्यार्थ्यांसोबत साजरे करण्यासाठी पुन्हा येऊ, असे आश्वासनही त्यांनी दिले. या कार्यक्रमास चित्रपटातील कलाकार कादंबरी कदम, प्राजक्ता कोळी, हरीश दुधाडे, संस्थेच्या उपाध्यक्षा अरुणा जाधव, विद्यालयाचे माजी विद्यार्थी धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील, संपादक डॉ. किशोर पाटील, प्रसिद्ध उद्योजक चंद्रकांत भोईर, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक संतोष चौधरी उर्फ दादुस, बी.एन.एन. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. निनाद जाधव, उपमुख्याध्यापक राजेंद्र शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वार्षिक डायरीचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक सुधीर घागस यांनी केली. पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन संगीता जाधव व रश्मी मोहरकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन पर्यवेक्षक ज्ञानेश्वर गोसावी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नमुंमपा निवडणूक 2025–26
## मतदान दिवशी भरपगारी सुट्टी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार असून, या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ३० डिसेंबर २०२५ रोजी परिपत्रक जारी करून मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांना भरपगारी सुट्टी जाहीर केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार घेण्यात येणाऱ्या या निवडणुकीत, मतदान क्षेत्रात नोंदणीकृत मतदार असलेले कामगार, अधिकारी व कर्मचारी कामानिमित्त निवडणूक क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना मतदानासाठी सुट्टी देणे बंधनकारक राहणार आहे. यामुळे कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, हा शासनाचा उद्देश आहे.

हे परिपत्रक उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांना लागू राहणार असून, यामध्ये खासगी कंपन्या, कारखाने, दुकाने, हॉटेल्स, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापारी व औद्योगिक उपक्रम, माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग मॉल्स, रिटेल आस्थापना आदींचा समावेश आहे.

दरम्यान, धोकादायक किंवा अत्यावश्यक लोकोपयोगी सेवा जिथे पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नाही, अशा ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांना मतदानासाठी दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे आवश्यक असल्याचेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

या आदेशाचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना मालक व व्यवस्थापनावर टाकण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाईची शक्यता नाकारता येत नाही. मतदानाचा टक्का वाढावा आणि लोकशाही प्रक्रियेत सर्वांचा सहभाग सुनिश्चित व्हावा, यासाठी शासनाचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# “मतदारांसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचा डिजिटल पुढाकार

**'ऑनलाईन मतदार सुविधा' पोर्टलचा निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते शुभारंभ”**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने, मतदारांना त्यांचे मतदान केंद्र आणि आवश्यक माहिती सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेने एक पाऊल पुढे टाकले आहे. आज दिनांक 06 जानेवारी 2026 रोजी दुपारी 1:30 वाजता, महानगरपालिका मुख्यालय येथील स्थायी समिती सभागृहात निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा. प्र.से.) यांच्या हस्ते विशेष ऑनलाईन सुविधेच्या लिंकचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

मतदारांना आता आपल्या मतदान केंद्राची अचूक माहिती मिळवण्यासाठी केवळ 'एक क्लिक' पुरेसे आहे. या पोर्टलच्या माध्यमातून खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

- मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राचा पत्ता आणि तेथे पोहोचण्यासाठी नकाशा (GPS Location) उपलब्ध असेल.
- मतदार यादीतील भाग क्रमांक, अनुक्रमांक आणि इतर वैयक्तिक माहिती तात्काळ पाहता येईल.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे (Affidavits) आणि प्रभागांची रचना सहज पाहता येईल.
- या सुविधेमुळे मतदारांना प्रत्यक्ष 'व्होटर स्लिप'वर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

अशा प्रकारची नावीन्यपूर्ण आणि तंत्रस्नेही संकल्पना राबविणारी उल्हासनगर महानगरपालिका ही राज्यातील पहिली महानगरपालिका ठरली आहे.

तसेच महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या मुख्य संकेतस्थळावर निवडणुकीशी संबंधित सर्व महत्त्वाचे दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील माहितीचा समावेश आहे.

- वैध नामनिर्देशन पत्रे आणि माघार घेतलेल्या उमेदवारांची यादी.
- प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी 2025-26 आणि पुरवणी मतदार यादी.
- निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नियुक्ती आदेश.
- प्रारूप व अंतिम प्रभाग रचना आणि सुधारित अधिसूचना.

मतदारांनी खालील लिंकचा वापर करून या सुविधेचा लाभ घेण्याचे आणि लोकशाहीच्या या उत्सवात उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

1. https://umc.localbody.org
2. https://umcvotersearch.com
3. https://www.umc.gov.in

यावेळी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त श्री.किशोर गवस, निवडणूक निर्णय अधिकारी श्री. बाळासाहेब तिडके, श्री. गणेश सांगळे, श्री. विशाल जाधवर, श्री. विजयकुमार वाकोडे, श्री. मुकेश पाटील, डॉ. संजय शिंदे, तसेच पोलीस विभागाचे डी.सी.पी. श्री.सचिन गोरे, महापालिकेच्या उपायुक्त (निवडणूक) श्री. विशाखा मोटघरे, सहा. आयुक्त (1) तथा जनसंपर्क अधिकारी श्री. अजय साबळे, सहा. आयुक्त श्री. गणेश शिंपी, पत्रकार व इतर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



गुरुवार
०८ जानेवारी २०२६

**मेष**
आज चांगल्या मोठ्या कंपनीकडून नवीन नोकरीसाठी फोन येऊ शकतो. नवीन अभ्यासक्रमात सामील होण्यासाठी देखील आजचा दिवस शुभ आहे.

**वृषभ**
व्यावसायिकांना आज नवीन करार मिळू शकतो. शिवाय, जोडीदाराचा सल्ला घेतल्याने व्यवसायाचे एखाद्या मोठ्या कंपनीशी असलेले संबंध सुधारतील.

**मिथुन**
नोकरी करणाऱ्यांसाठी आज आनंदाची बातमी आहे, कामाचा ताण कमी असेल. आज तुमचे एखाद्या मित्राशी मतभेद होऊ शकतात, भांडणामुळे वाईट वाटेल.

**कर्क**
अनुभवी लोकांचा सल्ला भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. तुम्ही जोडीदारासोबत आणि मुलांसोबत भविष्यातील योजनांवर चर्चा कराल.

**सिंह**
कोणतेही काम पूर्ण करताना तुम्हाला अनेक महत्त्वाच्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. तुम्ही त्यांना संयमाने तोंड द्याल आणि ते काम पूर्ण कराल.

**कन्या**
जुन्या कल्पना सोडून नवीन कल्पना स्वीकारण्यासाठी शुभ आहे. ही कल्पना पाहून तुमचे कुटुंब उत्साहाने भरून जाईल. खाण्याचा आनंद घ्याल.

**तुळ**
दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता आहे. खूप पूर्वी उधार दिलेले पैसे आज परत मिळतील.आरोग्य सुधारेल. तुम्हाला

**वृश्चिक**
आवडीचे लोक भेटतील. त्यांच्याशी गप्पा मारून वेळ आनंदात जाईल.ओळखीच्या लोकांना उधार दिलेले पैसे आजच्या दिवशी परत मिळतील.

**धनु**
तुमची एक महत्त्वाची व्यावसायिक बैठक असू शकते. निघण्यापूर्वी तुमचे ईमेल नीट तपासा. मित्रांसोबत वेळ घालवल्याने तुमचा मूडही चांगला राहील.

**मकर**
तुम्ही ज्यांच्याशी संपर्कात याल त्यांच्याशी प्रेमाने वागाल. सर्व कामे पूर्ण नीट,व्यवस्थित पूर् करू नका, घाईने त्रास होईल. संकट येऊ शकते.

**कुंभ**
इतकी प्रगति करण्यास मदत केली आहे, ते म्हणजे तुमचे पालक आणि शिक्षक. त्यांच्याशी प्रेमाने वागाल. मित्र आणि काम यांच्यात संतुलन राखावे लागेल.

**मीन**
तुम्हाला एखाद्या प्रतिष्ठित कंपनीकडून नोकरीची ऑफर देणारा फोन येऊ शकतो. या राशीच्या व्यावसायिकांनी त्यांचे महत्त्वाचे कागदपत्रे त्यांच्याकडे ठेवावीत.






# फडणवीसांचं ठाणेकरांना पत्र !

“ माझ्या ठाणेकरांनो, तुम्ही भारतीय जनता पक्षावर दाखवलेला विश्वास हा केवळ आकड्यांमधील जनादेश नाही, तर आमच्यासोबत जोडलेले एक भावनिक नाते आहे. सत्ता ही जबाबदारी असते आणि ठाणे हे केवळ शहर नसून लाखो स्वप्नांचे घर आहे. महायुती सरकारच्या काळात ठाण्यात जे बदल घडले, ते केवळ कागदावरील अहवालांपुरते मर्यादित नाहीत, तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनात दिसून येतात. हा विकास उद्घाटनांच्या फिती कापणारा नसून, वेळेत पूर्ण होणारा आणि प्रत्यक्ष वापरात येणारा आहे. ‘विश्वास, विकास आणि वेग’ ही ठाण्याच्या नव्या ओळखीची पायाभरणी आहे. राष्ट्रीय महामार्ग, बंदरे, विमानतळे आणि समृद्धी महामार्गामुळे ठाणे आज देशाच्या विकासाच्या केंद्रस्थानी येत आहे. १५ जानेवारी २०२६ रोजीचे मतदान ठाण्याच्या भविष्यासाठी निर्णायक ठरेल. त्या दिवशी कमळाच्या चिन्हावर मतदान करताना तुम्ही केवळ एका पक्षाला नाही, तर सुरक्षित, समृद्ध आणि स्वप्नांना पंख देणाऱ्या उद्यासाठी निर्णय घ्याल. ठाण्यासाठी दिलेले प्रत्येक आश्वासन प्रत्यक्षात उतरवण्यास आम्ही पूर्ण ताकदीनिशी कटिबद्ध आहोत. – **देवेंद्र फडणवीस** ”

**- दीर्घकालीन विकासाचा अजेंडा मतदारांपर्यंत पोहोचवून आगामी महापालिका निवडणुकीत पाठिंबा मिळवण्यासाठी एकनाथ शिंदेच्या ठाण्यात देवेंद्र फडणवीसांनी लिहीलेले हे पत्र सध्या चर्चेचा विषय बनले आहे. त्यावर केलेली ही राजकीय समिक्षा !**

●●●

ठाणे महापालिका निवडणुकीत भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्र लढत असली, तरी राजकीय वास्तव मात्र वेगळे चित्र दाखवत आहे. ठाण्यात शिवसेना (शिंदे गट) ही ‘मोठ्या भावाची’ भूमिका बजावत असताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट ठाणेकरांना उद्देशून लिहिलेले स्वतंत्र पत्र हे केवळ औपचारिक नव्हे, तर ठाण्यात भाजपची स्वतंत्र राजकीय ओळख ठळकपणे मांडणारे पाऊल ठरले आहे. या पत्रावर भाजपचा आणि मुख्यमंत्र्यांचा ठसा स्पष्टपणे दिसतो. युती असली तरी भाजपने ठाणेकरांसमोर स्वतंत्र जाहीरनामा मांडत आपली भूमिका आक्रमकपणे मांडली आहे. याउलट शिवसेनेचा अधिकृत जाहीरनामा अद्याप समोर न आल्याने, भाजपने प्रचारात पहिलाच आघाडीचा वार केल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे पत्र हे पारंपरिक राजकीय आवाहन न राहता, भावनिक आणि विकासकेंद्री कथानक उभे करते. ‘आकड्यांमधील जनादेश नाही, तर भावनिक नाते’ असे सांगत त्यांनी ठाणेकरांशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. सत्ता म्हणजे जबाबदारी, आणि ठाणे म्हणजे स्वप्नांचे घर – ही मांडणी भाजपला केवळ सत्ताधारी नव्हे, तर शहर घडवणारा भागीदार म्हणून सादर करते. या पत्रातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विकासाची व्याख्या. उद्घाटनांच्या फितीपुरता विकास न राहता, प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या, वेळेत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांवर भर देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ‘परिणामाधिष्ठित विकास’ ही भाजपची ओळख अधोरेखित केली आहे. राष्ट्रीय महामार्ग, बंदरे, विमानतळे, समृद्धी महामार्ग यांचा उल्लेख करत ठाण्याला ‘केंद्रस्थानी येणारे शहर’ म्हणून सादर केले आहे. ‘विश्वास, विकास आणि वेग’ ही त्रिसूत्री केवळ घोषवाक्य न राहता, ठाण्याच्या नव्या ओळखीची पायाभरणी असल्याचा दावा केला आहे. यामधून भाजप ठाण्याकडे भविष्यातील मेट्रोपॉलिटन हब म्हणून पाहत असल्याचा संदेश मतदारांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न दिसतो. महत्त्वाचे म्हणजे, हे पत्र केवळ निवडणुकीपुरते न ठेवता १५ जानेवारी २०२६ च्या मतदानाला ‘ठाण्याच्या भविष्यासाठी निर्णायक क्षण’ म्हणून मांडते. ‘कमळाच्या बटणाचा’ उल्लेख थेट आणि स्पष्ट असूनही, तो मुलांच्या सुरक्षित भवितव्याशी जोडत भावनिक पातळीवर परिणाम साधतो. एकूणच, एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या ठाण्यात देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले हे पत्र म्हणजे युतीत राहूनही भाजपचा स्वतंत्र, आत्मविश्वासपूर्ण आणि दीर्घकालीन अजेंडा मांडण्याचा प्रयत्न आहे. या पत्राच्या माध्यमातून भाजप ठाण्यात केवळ भागीदार नाही, तर नेतृत्व करण्यास तयार असल्याचा सूचक संदेश देताना दिसतो. फडणवीस यांचे पत्र म्हणजे युतीत राहूनही भाजपचा स्वतंत्र आणि आत्मविश्वासपूर्ण अजेंडा मांडण्याचा प्रयत्न आहे. विकासाच्या मुद्द्यांवर भावनिक भाष्य करत भाजपने ठाणेकरांशी थेट नातं जोडण्याचा प्रयत्न केला आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या ठाण्यात भाजप आपली स्वतंत्र ओळख ठळक करत असल्याचे या पत्रातून स्पष्ट होते. जाहीरनाम्याच्या आधीच मतदारांपर्यंत पोहोचलेला हा संदेश प्रचारात भाजपला आघाडी देणारा ठरू शकतो. आता ठाणेकर या संदेशाला कितपत प्रतिसाद देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कल्याण-डोंबिवलीतील बदलत्या राजकीय समीकरणांचे द्योतक

## कल्याण ग्रामीणमध्ये ठाकरे गटाची गळती, महायुतीचा ‘वॉकओव्हर’

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

अधिकृत उमेदवारानेच महायुतीच्या उमेदवाराला बिनशर्त पाठिंबा देत थेट शिंदे गटात प्रवेश करणे म्हणजे स्थानिक पातळीवरील संघटनात्मक अपयश उघडपणे समोर येणे होय. याआधीच दुसऱ्या विरोधी उमेदवाराने पाठिंबा दिल्याने या पॅनलमध्ये ठाकरे गट अक्षरशः नामशेष झाला आहे. प्रचार, मतमागणी आणि राजकीय संघर्षाविना मिळालेली ही जागा महायुतीसाठी केवळ विजय नाही, तर विरोधकांना दिलेला मानसिक धक्का आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेला प्रवेश हा सत्तेच्या केंद्राचा स्पष्ट संदेश देतो कल्याण ग्रामीणमध्ये



‘विजयी बाजू कोणती’ हे ठरलेले आहे. या घटनेमुळे ठाकरे गटातील संभ्रम, अस्वस्थता आणि संभाव्य गळती अधिक वाढण्याची शक्यता आहे. पॅनल क्रमांक ३० (ड) मध्ये घडलेला हा राजकीय उलटफेर केवळ एका उमेदवाराच्या पाठिंब्यापुरता मर्यादित नाही, तर कल्याण–डोंबिवलीतील बदलत्या राजकीय समीकरणांचे द्योतक आहे. ठाकरे गटाकडून अधिकृत उमेदवार असलेले रामचंद्र माने यांचे महायुतीच्या उमेदवाराला बिनशर्त समर्थन आणि थेट शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश हे विरोधकांसाठी मोठे धक्कादायक मानले जात आहे.

या घडामोडीमुळे ठाकरे गटाची संघटनात्मक पकड ग्रामीण भागात कमकुवत होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. याआधी डॉ. मनोज पाटील यांनीही महायुतीला पाठिंबा दिल्याने, पॅनल ३० (ड) मध्ये महायुतीला प्रत्यक्ष लढतच उरलेली नाही. ही स्थिती म्हणजे प्रचार, खर्च आणि संघर्षाविना मिळालेला राजकीय ‘वॉकओव्हर’ ठरतो. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेला प्रवेश हा प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाचा असून, स्थानिक पातळीवर शिंदे गटाची पकड अधिक घट्ट झाल्याचा संदेश देतो. त्यामुळे

●●●●

**कल्याण ग्रामीणमध्ये घडलेला उलटफेर महायुतीच्या बाजूने वातावरण झुकल्याचे स्पष्ट संकेत देतो. विरोधी उमेदवारांची गळती ठाकरे गटाच्या संघटनात्मक आव्हानांकडे लक्ष वेधते. लढतच न उरल्याने महायुतीला हा राजकीय ‘वॉकओव्हर’ ठरतो. स्थानिक नेतृत्व आणि सत्तेचा प्रभाव या घडामोडीत ठळकपणे दिसतो. याचा परिणाम उर्वरित प्रभागांवरही होण्याची शक्यता आहे.**

●●●●

कार्यकर्त्यांमध्ये ‘विजय आधीच निश्चित’ असा मानस तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या एकतर्फी लढतीचा थेट परिणाम उर्वरित प्रभागांवरही होऊ शकतो. कल्याण ग्रामीण भागात महायुतीचा ‘मूड सेट’ झाल्याने, इतर प्रभागांतील संभ्रमात असलेले उमेदवार आणि कार्यकर्तेही बाजू बदलण्याची शक्यता आहे. एकूणच, हा उलटफेर ठाकरे गटासाठी इशारादायक असून महायुतीसाठी मनोबल वाढवणारा ठरतो. आता प्रश्न इतकाच आहे की हा कल इतर पॅनलमध्येही दिसतो का, की हा अपवाद ठरतो—यावरच निवडणुकीचे एकूण चित्र ठरणार आहे.

पॅनल क्रमांक ३० (ड) मध्ये घडलेला उलटफेर हा केवळ उमेदवार बदलाचा प्रसंग नसून ठाकरे गटाच्या कल्याण–डोंबिवलीतील राजकीय रणनीतीला बसलेला मोठा धक्का आहे.



# महापालिकांचा महासंग्राम

# मतमोजणीवर काँग्रेसचे प्रश्नचिन्ह

## निकालापूर्वीच ‘विश्वासाचा’ मुद्दा ऐरणीवर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मतमोजणीस २४ तासांहून अधिक वेळ लागण्याची शक्यता मांडत काँग्रेसने थेट लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर बोट ठेवले आहे. एका निवडणूक निर्णय अधिकाऱ्याअंतर्गत आठ प्रभागांची मतमोजणी ही रचना मुळातच वेळखाऊ असल्याचे सांगत काँग्रेसने संभाव्य गोंधळ, संशय आणि निकालांवरील अविश्वास याची पार्श्वभूमी आधीच तयार केली आहे. हा मुद्दा उपस्थित करून काँग्रेसने ‘निकालानंतर प्रश्न उपस्थित करण्याऐवजी निकालापूर्वीच प्रक्रिया पारदर्शक करा’ असा दबाव राज्य निवडणूक आयोगावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीयदृष्ट्या पाहता, मुंबई महापालिकेत काँग्रेसची ताकद मर्यादित असली तरी मतमोजणीसारख्या तांत्रिक मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत पक्ष स्वतःला लोकशाहीचा ‘वॉचडॉग’ म्हणून सादर करत आहे. संभाव्य पराभवाच्या पार्श्वभूमीवर निकाल प्रक्रियेवर लक्ष केंद्रीत करणे ही काँग्रेसची परिचित रणनीती मानली जाते. याशिवाय, मतमोजणी उशिरा झाल्यास निर्माण होणाऱ्या अफवा, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय अस्थिरतेची शक्यता अधोरेखित करून काँग्रेसने सत्ताधारी आणि निवडणूक यंत्रणेवर अप्रत्यक्ष दबाव वाढवला आहे. ‘योग्य नियोजन असेल तर काही तासांत निकाल शक्य’ हा दावा म्हणजे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह टाकण्याचा प्रयत्न आहे.

# पनवेलमध्ये जुन्यां गड्यांचा नवा खेळ’

## ७१ पैकी ४६ जागांवर माजी नगरसेवकांचा कब्जा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल** - पनवेल महापालिकेच्या आगामी निवडणुकीत माजी नगरसेवकांचे वर्चस्व ठळकपणे दिसून येत असून, पुन्हा एकदा जुन्याच चेहऱ्यांवर राजकीय पक्षांनी विश्वास टाकल्याचे चित्र आहे. २० प्रभागांतील ७८ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असली, तरी त्यापैकी सात जागांवर एकच उमेदवार असल्याने प्रत्यक्ष लढत ७१ जागांवरच होणार आहे. या ७१ जागांसाठी माजी नगरसेवक व त्यांच्या कुटुंबीयांनी तब्बल ४६ ठिकाणी उमेदवारी मिळवली आहे. त्यामुळे १५ जानेवारीला होणाऱ्या मतदानात मतदार पुन्हा एकदा अनुभवी आणि परिचित चेहऱ्यांनाच संधी देणार की बदलाचा कौल देतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे महापालिकेत सत्ता येण्यासाठी ४० नगरसेवकांचे बहुमत लागणार असून भाजपने अर्ज माघारीच्या पहिल्याच फेरीत ६ जागांवर बिनविरोधाची स्थिती निर्माण केली आहे. या निवडणुकीत ४१ माजी नगरसेवक थेट रिंगणात उतरले असून, उर्वरित पाच जागांवर माजी नगरसेवकांनी आपल्या मुलगा, पत्नी किंवा पतीस उमेदवारी मिळवून दिली आहे. शेकाप महाविकास आघाडीने सात माजी नगरसेवकांना संधी दिली आहे, तर भाजप महायुतीने तब्बल ३४ जागांवर माजी नगरसेवकांना उमेदवारी दिली आहे. यामुळे अनुभवाच्या जोरावर निवडणूक जिंकण्याची रणनितीचा प्रयत्न स्पष्टपणे दिसतो. दरम्यान, काही प्रभागांत अंतर्गत नाराजी उफाळून आली आहे.

# मिरा-भाईंदरमध्ये माजी महापौर आमनेसामने

## चार माजी महापौरांची प्रतिष्ठा पणाला

**मिरा-भाईंदर महापालिकेच्या आगामी निवडणुकीत चार माजी महापौर थेट निवडणूक रिंगणात उतरल्याने काही प्रभागांत लढतींना प्रतिष्ठेचे स्वरूप आले आहे. पालिकेच्या स्थापनेनंतर महिलांचे नेतृत्व ठळक राहिले असताना, या माजी महापौरांच्या पुनरागमनाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मिरा-भाईंदर महापालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत पालिकेतील नेतृत्वावर महिलांचे वर्चस्व राहिले आहे. आतापर्यंत झालेल्या आठ निवडणुकांपैकी सहा वेळा महापौरपद महिलांकडे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर यंदाच्या महापालिका निवडणुकीत चार माजी महापौर थेट निवडणूक लढवत असल्याने त्यांच्या प्रतिष्ठेची कसोटी लागली आहे.

या चार माजी महापौरांपैकी तीन भाजपकडून तर एक शिवसेनेकडून विविध प्रभागांतून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे काही प्रभागांत लढत अधिक चुरशीची होण्याची शक्यता आहे. महापौरपद महिलांकडे अधिक काळ राहिले असले तरी उपमहापौरपदावर मात्र पुरुषांचे वर्चस्व राहिले आहे. आतापर्यंतच्या आठ कार्यकाळांपैकी सात वेळा उपमहापौरपद पुरुषांकडे राहिले आहे. यंदाच्या निवडणुकीत मात्र भाजपचे माजी उपमहापौर हसमुख गेहलोत हे एकमेव माजी उपमहापौर निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

हसमुख गेहलोत हे माजी महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांच्या कार्यकाळात उपमहापौरपदावर विराजमान होते. त्यामुळे मिरा-भाईंदर महापालिका निवडणुकीत महिलांचे नेतृत्व आणि अनुभवी माजी पदाधिकारी यांचा सामना पाहायला मिळणार असून, या प्रतिष्ठेच्या लढतीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# राज ठाकरेंना बदलापूरातून धक्का

## मनसेच्या रणरागिणीची पक्षातून ‘एक्झिट’

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर | प्रतिनिधी**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रणरागिणी संगिता चेंदवणकर यांनी अखेर पक्षाला रामराम ठोकत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. पक्षांतर्गत डावपेच, स्थानिक पातळीवरील राजकारण आणि अलीकडील नगरपरिषद निवडणुकीतील घडामोडींमुळे हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले असून, पक्ष सोडताना केलेल्या काही धक्कादायक खुलास्यांमुळे बदलापूरसह राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**

कुळगाव–बदलापूर नगर परिषदेची निवडणूक २ डिसेंबर रोजी पार पडली, तर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाली. या निवडणुकीत अनेक अनपेक्षित निकाल समोर आले. विशेष म्हणजे सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) थेट नगराध्यक्षपदाच्या लढतीत मागे पडली. या जागी भाजपने बाजी मारली, तर भाजप–अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला अपेक्षेपेक्षा एक जागा अधिक मिळाल्याने स्थानिक राजकारणात नवे समीकरण तयार झाले आहे. दरम्यान, या निवडणुकीत मनसेच्या या रणरागिणीला दोन्ही ठाकरे गटांच्या शिवसेनेने नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर करूनही प्रत्यक्षात स्थानिक पातळीवर त्यांची कोंडी केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे त्यांना अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करावा लागला. मात्र निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. या पराभवानंतर त्यांनी मनसेच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला.

अजित पवार गटामध्ये प्रवेश करताना त्यांनी पक्षातील अंतर्गत राजकारण, महिलांना मिळणारे दुय्यम स्थान आणि स्थानिक नेत्यांकडून होणारी उपेक्षा याबाबत काही गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे हा प्रवेश केवळ पक्षांतर न राहता, बदलापूरमधील आगामी राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकणारा ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकीकडे नगरपरिषद निवडणुकीतील निकाल, तर दुसरीकडे मनसेच्या प्रमुख चेहऱ्याचा राष्ट्रवादीत प्रवेश — या दोन्ही घडामोडींमुळे बदलापूरचे राजकारण तापले असून, येत्या काळात आणखी उलथापालथी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी बोलताना संगिता चेंदवणकर यांनी खळबळजनक आरोप केले. ठाकरेंची शिवसेना आणि मनसे पक्ष शहरातील एक बड्या नेत्याच्या इशाऱ्यावर चालतात असा आरोप त्यांनी माध्यमांशी बोलताना केला. नागरिकांच्या प्रश्नांसाठी मी रस्त्यावर उतरत होते मात्र माझी कोंडी केली जात होती. त्यामुळे कंटाळून मी पक्ष सोडल्याचे त्यांनी सांगितले.





# कचरावेचक महिलांमध्ये मतदान करण्याविषयी जनजागृती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण :** निवडणूक विषयक स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा या करिता मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत असून यामध्ये यावर्षी पहिल्यांदाच बहुसदस्यीय पॅनल पध्दतीने मतदान होणार असल्याने 1 ते 27 प्रभागामध्ये 4 जागांसाठी तसेच 28 व्या प्रभागात 3 जागांसाठी स्वतंत्र मतदान करण्याबाबतही माहिती प्रसारित करण्यात येत आहे. मतदानाविषयी जनजागृतीमध्ये वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करुन विविध समाज घटकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जात असून या अनुषंगाने नवी मुंबईतील कचरावेचक महिलांना एकत्र करुन त्यांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले व पॅनल पध्दतीमध्ये करावयाच्या मतदानाची माहिती देण्यात आली. से.14 कोपरखैरणे येथील निसर्गोद्यानात उपस्थित 125 हून अधिक कचरा वेचक महिलांमध्ये मतदानाविषयक जनजागृती करण्यात आली. यावेळी नवी मुंबई स्वयंसेवी संस्थेच्या प्रमुख प्रा.वृषाली मगदूम यांनीही उपस्थित महिलांना संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क स्वत: तसेच त्यांच्या कुटूंबियांनीही बजावावा याबाबत आवाहन केले.

# शिक्षक संघाच्या वतीने गुणवंत शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार सोहळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ पेण तालुक्याच्या वतीने ७ जानेवारी रोजी शिक्षक वर्धापन दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ तथा कोकण विभाग अध्यक्ष प्रमोद श्रीधर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आगरी विकास मंच पेण येथे शिक्षक वर्धापन दिन साजरा करण्यात आला यावेळी पेण तालुक्यातील गुणवंत शिक्षक पुरस्कार व आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करून त्यांना गौरवण्यात आले तसेच सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षकांचा देखील सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी, गटशिक्षणाधिकारी श्रीमती शर्मिला शेंडे, विस्तार अधिकारी अरूणा देवी मोरे जिल्हा परिषद माजी सदस्य प्रभाकर म्हात्रे डी.बी.







पाटील,प्राथमिक शिक्षक सेवानिवृत्त संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील जिल्हा उपाध्यक्ष आदिनाथ पाटील ,माजी चेअरमन मोहन भोईर ,सल्लागार किशोर पाटील, जिल्हा संघटक नंदकुमार थवई जिल्हा महिला आघाडी प्रमुख सरिता पाटील ,सल्लागार राजेंद्र पाटील अरविंद वाघमारे पेण तालुक्यातील आदर्श शाळांमध्ये प्राथमिक शाळा आंबिवली, वलक, कोलवे या तीन शाळांचा सत्कार करण्यात आला. तर गुणवंत शिक्षक म्हणून आदर्श जिल्हा शिक्षक पुरस्कार प्राप्त किशोर लक्ष्मण पाटील तर पेण तालुका आयडॉल शिक्षक म्हणून विनोद दामोदर म्हात्रे यांचा सत्कार त्याचबरोबर पेण तालुका गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राप्त सौ वैशाली प्रदिप वर्तक(शाळा- वरेडी) दत्तात्रेय हरिभाऊ ठाकूर शाळा(शिकी चाळ नं. 2)सौ. अनिता गणेश थवई (शाळा- दुष्मी) सुनिल धर्माजी पाटील (शाळा रावे) सौ विजया विठोबा पाटील (शाळा- तांबडशेत) रमेश बाळाराम सावंत (शाळा- भोरमाळ) सौ. प्रिया प्रधान पाटील(शाळा अधर्णे) प्रकाश प्रमानंद ठाकूर (शाळा बेलवडे खुर्द) गणेश बालू ठोंबरे (शाळा आसानी) जिजाबाई शंकर वारजे (शाळा उंबर्डे) संदीप लहू पोटफोड (शाळा प्रधानवाडी) परशुराम नथुराम मोकल (शाळा कोलेटी) या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह शाळा श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. I कार्यक्रम उत्तमरीत्या पार पाडण्यासाठी अखिल पेण तालुका प्राथमिक शिक्षक कार्यकारिणीचे अध्यक्ष जयश्री सावंत कार्याध्यक्ष विठोबा पाटील कोषाध्यक्ष राजश्री पेरवी, सरचिटणीस प्रवीण पाटील, उपाध्यक्ष टिळक म्हात्रे ,गजानन पाटील यासह तालुक्यातील शिक्षक प्रतिनिधी केंद्र प्रतिनिधी केंद्रप्रमुख आदीनी विशेष परिश्रम घेतले.

# मुरबाड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** शिक्षण विभाग पंचायत समिती मुरबाड आयोजित ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा विस्डम इंग्लिश मेडियम स्कूल देवपे ता. मुरबाड जि. ठाणे येथे संपन्न झाले. प्रमुख पाहुणे बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद ठाणे यांच्या शुभहस्ते दिनांक ५ जानेवारी रोजी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. व प्रत्येक दालनाची फित कापून मान्यवरांनी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले. या विज्ञान प्रदर्शनात एकूण ८३वैज्ञानिक साहित्याचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. विद्यार्थी व शिक्षकांनी अतिशय चांगल्या पद्धतीने साहित्याची निर्मिती करून मांडणी केली होती.उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व आदिवासी विभाग गटामध्ये वैज्ञानिक साहित्याचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. तसेच शिक्षकांसाठी आयोजित शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रदर्शनात गणितीय मनोरंजन व बोधप्रत साहित्याची मांडणी करण्यात आली होती. मा.शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले वैज्ञानिक दृष्टिकोन, त्याचा वापर, वैज्ञानिकांची माहिती, विज्ञानाचा उपयोग, त्यांचे शोध यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. भविष्यात केंद्रस्तरीय प्रदर्शन मांडण्याची त्यांनी जाहीर केले. भविष्यात प्रत्येक शाळेतून वैज्ञानिक तसेच तंत्रज्ञ निर्माण होतील अशीही भाष्य केले. विज्ञान प्रदर्शनाचे प्रास्ताविक मा. गटशिक्षणाधिकारी मधुकर घोरड यांनी केले. त्यात त्यांनी प्रदर्शनाची यशस्वीता मांडली. तसेच प्रदर्शनाचा हेतू स्पष्ट केला. त्याचप्रमाणे शिक्षण विभाग पंचायत समिती मुरबाड मार्फत होत असलेल्या विविध शालेय सहशालेय उपक्रमांची माहिती दिली. सदर प्रदर्शनासाठी शिक्षण विस्तार अधिकारी महादू कनकोसे विस्डम इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक श्री. फवाज मुल्ला तसेच तालुक्यातील केंद्रप्रमुख व समग्र शिक्षा कर्मचारी व शिक्षक उपस्थित होते. या प्रदर्शनात शास्वत शेती, कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिक ला पर्याय, हरित ऊर्जा, उद्योन्मुख तंत्रज्ञान, मनोरंजक गणितीय मॉडलिंग, आरोग्य आणि स्वच्छता, जल संवर्धन आणि व्यवस्थापन या सात विषयावर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. अनुभवी व तज्ञ परिक्षकांनी स्पर्धेचे परिक्षण केले !सदर प्रदर्शन हे दि. ५ व ६ जानेवारी २०२६पर्यंत सुरु होते .परिसरातील अनेक शाळांनी शिक्षकांनी प्रदर्शनास भेट दिली. प्रदर्शनाची सांगता / समारोप पंचायत समिती मुरबाडच्या शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी मधुकरजी घोरड यांनी केले आहे. त्यांनी विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविले.

# आमदार कथोरेंचा फोटो बसवून राष्ट्रवादी काँग्रेसने मुरबाडकरांची मने जिंकली



**मुरबाड नगरपंचायतच्या नगराध्यक्ष दालनातून आमदार किसन कथोरे यांचा फोटो हटवण्यात आल्याने शहरात राजकीय व सामाजिक चर्चा सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने पुढाकार घेत फोटो पुन्हा बसविल्याने मुरबाडकरांमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/मुरबाड :** नगरपंचायतच्या स्थापनेपासून शहरात विविध विकास योजना राबवून आमदार किसन कथोरे यांनी मुरबाडचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यांच्या विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवत मुरबाडकरांनी दोन पंचवार्षिक निवडणुकांत भाजपला नगरपंचायतमध्ये एकहाती सत्ता दिली होती. मात्र मागील वर्षी नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्यासह नऊ नगरसेवकांनी भाजपविरोधात बंड पुकारत आधी मुरबाड विकास आघाडी आणि नंतर शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने भाजपची सत्ता संपुष्टात आली. या राजकीय घडामोडींनंतर नगरपंचायतच्या नगराध्यक्ष दालनात स्थापनेपासून लावलेला आमदार किसन कथोरे यांचा फोटो काढण्यात आल्याने मुरबाड शहरात तीव्र चर्चा सुरू झाली आहे. पक्ष बदलल्यानंतर एका कार्यक्षम व विद्यमान लोकप्रतिनिधीचा फोटो हटवण्यात आल्याबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ही बाब राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुका अध्यक्ष दीपक वाघचौरे यांच्या लक्षात येताच त्यांनी कार्यकर्त्यांसह राजकारण बाजूला ठेवत आमदार किसन कथोरे व भिवंडी लोकसभेचे खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांचे फोटो पुन्हा दालनात लावले व घटनेचा निषेध केला.

या संदर्भात नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिक्रिया देणे टाळले. दरम्यान, दीपक वाघचौरे व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेचे मुरबाड शहरात कौतुक होत आहे.

# आतकोली येथील सावित्रीबाई फुले महिला सभागृहाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** भादाणे गृप ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या भिवंडी तालुक्यातील आतकोली येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महीला सभागृहाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भादाणे गृप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच प्रदिप भोईर यांच्या विशेष प्रयत्नाने जिल्हा महीला विकास योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या महिला सभागृहाचे उद्घाटन महीला आर्थिक



विकास महामंडळाच्या माजी अध्यक्षा व शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या ज्योतीताई ठाकरे, उपनेते तथा प्रसिद्ध सह्याद्री नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक विश्वास थळे उपजिल्हाप्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले. यावेळी सरपंच जोत्स्ना भालेकर प्रभारी सरपंच मेघा प्रदिप भोईर, ग्रामपंचायत सदस्य नितीन शेलार, वंदना शेलार, दर्शना ठाकरे, विमल वाघे माजी उपसरपंच रमेश शेलार यांच्या सह भास्कर माळी, राजेंद्र काबाडी, प्रमिलाताई भोईर,संजय पटेल,रुपेश कडूसकर,अनंता राऊत, सुरेंद्र शेलार, हरेश राऊत , मधुकर राऊत, मारुती शेलार, विजय भोईर, संजय राऊत, संतोष शेलार, योगेश भोईर, रविंद्र पाटोळे, रवींद्र भोईर, संदीप महाराज भोईर, चिंतामण भोईर,रविंद्र निपुर्ते नीरज निपुर्ते, राजाराम शेलार, मधुकर राऊत, कुणाल भोईर,महेश भोईर व आतकोली येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# स्वच्छ सर्वेक्षण 2025–26 अंतर्गत ठाणे शहरात ‘सार्वजनिक शौचालय स्वच्छता मोहिम’

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** (07) - स्वच्छ सर्वेक्षण 2025–2026 अंतर्गत आज ठाणे महानगरपालिका हद्दीतील नौपाडा-कोपडी, वागळे व उथळसर प्रभागसमिती येथे व्यापक स्वरुपत सार्वजनिक शौचालय स्वच्छता Toilet Deep Clean Drive मोहिम राबविण्यात आली. आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशान्वये अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या सूचनेनुसार ही स्वच्छता मोहिम सकाळी 10 वाजल्यापासून सायंकाळी 6 वाजेपर्यत सुरू असल्याचे घनकचरा विभागाचे उपायुक्त मधुकर बोडके यांनी सांगितले.

ही स्वच्छता मोहिम सकाळी 10.00 वाजता सुरू होऊन सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत राबविण्यात आली. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सार्वजनिक शौचालयांची सखोल स्वच्छता, निर्जंतुकीकरण व परिसर सौंदर्यीकरण हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

या अभियानांतर्गत नौपाडा-



कोपडी, वागळे व उथळसर प्रभाग समितीतील प्रत्येकी 25 सुलभ शौचालये, अशा एकूण 75 सार्वजनिक शौचालये व त्यांचा परिसर सखोलपणे स्वच्छ करण्यात आला. शौचालय परिसरातील दुर्गंधी, कचरा, साचलेली माती व डाग पूर्णतः काढून टाकण्यात आले. स्वच्छतेनंतर फायलेरिया विभागामार्फत सर्व शौचालये व परिसरात जंतुनाशक फवारणी करण्यात आली. तसेच स्वच्छतेदरम्यान डांबर गोळी, एअर फ्रेशनर, फिनेल, ॲसिड, ब्लिचिंग पावडर आदी साहित्याचा वापर करून शौचालये निर्जंतुक, स्वच्छ व वापरास योग्य करण्यात आली.

पाण्याचा पुनर्वापर या संकल्पनेनुसार STP कोपरी, ठाणे येथील शुद्ध केलेल्या पाण्याचा वापर करून ही स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे स्वच्छतेसाठी ताज्या पाण्याचा वापर टाळण्यात आला. प्रत्येक प्रभाग समितीअंतर्गत 04 लहान जेटिंग मशिन्स व 02 उच्च दाबाची मोठी जेटिंग मशिन्स अशा एकूण 06 जेटिंग मशिन्स तैनात करण्यात आल्या. या अत्याधुनिक जेटिंग मशिन्सच्या सहाय्याने शौचालयातील मजले, भिंती, ड्रेनेज लाईन्स तसेच सभोवतालचा परिसर उच्च दाबाच्या पाण्याने धुवून काढण्यात आला. या मोहिमेत उपायुक्त उपआयुक्त मधुकर मधुकर बोडके, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह शयुराज कांबळे, पंजाबराव कवळे, स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी, प्रवीण बनोटे, संजू रणदिवे, अजय जगताप, सुनील जगताप तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सुमारे 250 कर्मचारी सहभागी झाले होते.

महानगरपालिका प्रशासनाकडून ठाणेकर नागरिकांना स्वच्छता हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे हे लक्षात घेऊन सार्वजनिक शौचालये स्वच्छ ठेवावीत व शहर स्वच्छतेसाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.





# बोरगाव शाळेची परसबाग पेण तालुक्यात सरस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** या उपक्रमात अंतर्गत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगाव,ता.पेण या प्रशालेने सन २०२५-२६ या वर्षात परसबाग स्पर्धेत पेण तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.

शालेय परिसरात परसबाग विकसित करून परसबागेत विविध प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या, फळझाडे, औषधी वनस्पतींची लागवड केली आहे.शालेय परिसरात सेंद्रिय खत निर्मिती करून त्याचा वापर भाज्या उत्पादित केल्या जातात व त्या भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनासाठी केला जातो.परसबागेत विविध प्रकारची फळझाडे, फुलझाडे, औषधी वनस्पती असून प्रत्येक झाडाला विद्यार्थ्यांची नावे दिली आहेत.त्या झाडांची संगोपनाची





जबाबदारी सोपविण्यात आली आहे. झाडांना QR कोड असून त्या झाडांची माहिती मोबाईल द्वारे स्कॅन करुन मिळविता येते.तसेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी प्रत्येक झाडाला म्हणी, स्लोगन पाट्या लावण्यात आल्या आहेत.पर्यावरणाचे रक्षण व शेतीविषयक सखोल माहिती या अनुषंगाने विद्यार्थी,शिक्षक, पालक यांच्या मदतीने अत्यंत उत्कृष्ट व विविधता असलेली परसबाग फुलविण्यात आली आहे.यासाठी शाळेचे मुख्याध्यापक महेश पाटील, सहशिक्षिका श्रीम.संगिता काळे व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.शाळेला परसबाग स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळाल्याने सर्व स्तरातून अभिनंदन केले आहे.

**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शालेय परिसरात परसबाग विकसित करणेबाबत अनेक शाळांमधून मोठ्या प्रमाणात शाळा व्यवस्थापन समिती, पालक व शिक्षक यांनी संयुक्त प्रयत्नाने परसबाग विकसित केलेल्या आहेत. विकसित करण्यात आलेल्या परसबागेतील उत्पादित भाजीपाल्याचा समावेश आहारामध्ये करण्यात येत आहे. शासनाने उत्कृष्ट परसबागांची केंद्र निहाय, तालुकास्तरीय स्पर्धा घेवून प्रथम तीन क्रमांक जिल्हा स्तरावर पाठवण्यात येत आहेत यामध्ये प्रथम क्रमांक रायगड जिल्हा परिषद बोरगावशाळा, द्वितीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद मायनी कोयना, तृतीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोडे तर प्रोत्साहन पर बक्षीस म्हणून रायगड जिल्हा परिषद खरोशी गंगेचीवाडी आणि तिलोरे या शाळांचे गुणानुक्रमे नंबर आले आहेत.**

**- श्रीमती शर्मिला शेंडे ,गट शिक्षणाधिकारी ,पंचायत समिती पेण**

**ग्रामीण भागातील बोरगाव सारख्या शाळेमध्ये परसबाग तयार करण्याकरता माझ्या शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक पालक ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच श्रीम. गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे ,श्रीम.अरुणादेवी मोरे पोषण आहार अधिक्षक केंद्रप्रमुख मोलाचे मार्गदर्शन लाभले.**

**- श्री. महेश पाटील ,मुख्याध्यापक बोरगाव शाळा**





Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024